## * खत व्यवस्थापन

सेंद्रिय खताचा भरपूर वापर केल्याने उत्पादनात आणि गुणवत्तेत वाढ होते. लसूण हे पीक गंधकयुक्त खतास चांगला प्रतिसाद देते. त्यामुळे लागवड करण्यापूर्वी हेक्टरी ५० किलो गंधक जमिनीत मिसळावे. रासायनिक खतांचे प्रमाण खालील प्रमाणे द्यावे.

| खते देण्याची वेळ | नत्र/हेक्टरी | स्फुरद / हेक्टरी | पालाश / हेक्टरी |
|---|---|---|---|
| लागवडीच्या वेळी | ३ बॅग यूरिया | ६ बॅग फॉस्फेट (SSP) | २ बॅग पोटॅश |
| लागवडीनंतर ३० दिवसांनी | ३७ किलो यूरिया | --- | --- |
| लागवडीनंतर ४५ दिवसांनी | ३७ किलो यूरिया | --- | --- |
| लागवडीनंतर ६० दिवसांनी | ३७ किलो यूरिया | --- | --- |

## * पाणी व्यवस्थापन

लसणाच्या पाकळ्या लावल्यानंतर पहिले पाणी लगेच द्यावे. दुसरे पाणी त्यानंतर ३ ते ४ दिवसांनी द्यावे. त्यानंतर ८ ते १० दिवसांच्या अंतराने जमिनीच्या मगदुरानुसार सिंचन करावे. लसणाची मुळे जमिनीत १५ ते २० सेंमी पर्यंच्या थरात असतात,त्यामुळे वरच्या थरात कायम ओलावा असणे आवश्यक आहे.

## * आंतरपिक पध्दती

लसूण पिकामध्ये वाफांच्या वरंब्यावर कोबी, कोथिंबीर, बीटरूट किंवा मुळा इत्यादी कमी कालावधीच्या पिकांची लागवड करता येते. तसेच लसणाची आंतरपिक म्हणून ऊस, मिरची, फळबागांमध्ये देखील लागवड करता येते.

## * आंतरमशागत

लागवडीनंतर सुरुवातीच्या दीड महिन्यात पिकात मोठ्या प्रमाणात तणांचा प्रादुर्भाव होतो. त्यासाठी खुरपणी करून तणनियंत्रण करावे.

## * काढणी आणि साठवण

सर्वसाधारणपणे लसणाचे पीक लागवडी नंतर १२० ते १५० दिवसांत काढणीस येते. पिकामध्ये ७५ टक्के माना पडल्यापासून १ आठवड्यापर्यंत लसणाची काढणी करावी (होळीच्या सणामध्ये). लसूण लहान कुदळीने किंवा खुरप्याने काढावा. काढलेल्या लसणाची पाने आंबट ओली असताना २० ते ३० सारख्या आकाराच्या गड्डयांची जुडी करून पानांची वेणी बांधून घ्यावी. वेण्या बांधलेला लसूण बांबूवर टांगून ठेवल्यास तो चांगला टिकतो. लसणामध्ये पाण्याचे प्रमाण कमी असल्यामुळे साठवणीत कांद्याच्या मानाने नुकसान कमी होते. लसणाचे साठवणीत गड्डे पोकळ होणाऱ्या नुकसानीस आळा घालण्यासाठी कंद पूर्णपणे पक्व झाल्यावर काढणी करणे महत्वाचे आहे.

## * उत्पादन

लसूण पिकापासून साधारपणे ९० ते१०० क्विंटल प्रति हेक्टरी उत्पादन मिळते.

भाकृअनुप
ICAR


* प्रस्तावना
* हवामान
* जमीन
* पूर्वमशागत
* सुधारित जाती
* बियाण्यांचे प्रमाण
* बीजप्रक्रिया
* लागवड तंत्र
* आंतरमशागत
* खत व्यवस्थापन
* पाणी व्यवस्थापन
* आंतरपीक पध्दती
* काढणी आणि साठवण
* उत्पादन



डॉ.हेडगेवार सेवा समिती,नंदुरबार

**कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार**

मु.पो.कोळदा ता.जि.नंदुरबार -४२५ ४१२
(महाराष्ट्र)
डॉ.वैभव गुर्वे, मो.नं.९६६५२०९७९९

Email
kvk_ndb@yahoo.com
Ph.No.(02564) 299315
Website: Nandurbar.kvk8.in



डॉ.हेडगेवार सेवा समिती,नंदुरबार


# कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार


मु.पो.कोळदा ता.जि.नंदुरबार




# लसुण लागवड तंत्रज्ञान


**डॉ.वैभव गुर्वे**
विषय विशेषज्ञ (उद्यान विद्या)

**श्री.राजेंद्र दहातोंडे**
वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख

# लसुण लागवड तंत्रज्ञान

## * प्रस्तावना

लसुण हे एक महत्वाचे कंदवर्गीय पीक म्हणून ओळखले जाते. नंदुरबार जिल्ह्यातील बहुतांश भागामध्ये लसुण पिकाची लागवड केली जाते, त्यामध्ये सर्वाधिक लागवडी खालील असलेले क्षेत्र धडगाव तालुक्यात बघावयास मिळते. कंदवर्गीय पिकामध्ये लसुण हे कांद्यानंतर महत्वाचे पिक आहे आणि या पिकाकडे आता नंदुरबार जिल्ह्यातील शेतकरी व्यापारी पीक म्हणून बघू लागले आहेत.

लसुण हे दैनंदिन आहारात,मसाले निर्मिती, विविध प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करताना याचा वापर केला जातो. लसणात विविध औषधीय गुणधर्म असुन श्वसन विकार, खोकला,दमा, फुफ्फुस आणि पोटाचे विकार, कान व डोळ्यांचे, उच्च रक्तदाब, हृदय रोग, कर्करोग,त्वचा विकार इत्यादींवर लसुण हे गुणकारी औषध आहे. तसेच लसण्याच्या सेवनामुळे पचन संस्था चांगली राहते.

## * हवामान

लसुण हे हिवाळी हंगामात येणारे पिक असून नंदुरबार जिल्ह्यामध्ये दिवाळीच्या सणात (ऑक्टोबर – नोव्हेंबर ) याची लागवड केली जाते.पिक वाढीच्या सुरुवातीच्या काळात थोडे दमट व थंड हवामान,तर पक्व होताना व काढणीवेळी कोरडे हवामान गरजेचे असते.या काळात लसणाच्या पाकळ्या लावल्यानंतर पानांची वाढ होते व त्यांची संख्या वाढते. हा काळ साधारपणे ४५ ते ५० दिवसांचा असतो. यानंतर पाकळ्या पोसू लागतात व लसूण कंद आकाराने वाढू लागतो. हा कालावधी ३० ते ४० दिवसांचा असतो. या काळात हवेतील आर्द्रता कमी व वाढलेले तापमान फायद्याचे ठरते. त्यामुळे पात वाळणे,कंद सुकणे या क्रिया सुलभ होतात.

## * जमीन

लसणाचा कंद जमिनीत पोसत असल्याने वाढीकरिता पाण्याचा उत्तम निचरा होणारी,भरपूर सेंद्रिय पदार्थ असलेली भुसभुशीत व कसदार जमीन लागते. जमिनीचा सामू ६.५ ते ७ असावा.मध्यम काळ्या भरपूर सेंद्रिय पदार्थ असलेल्या जमिनीत जास्त उत्पादन घेता येते. चांगला कंद पोसण्यासाठी जमिनीचा एक ते दीड फुटापर्यंतचा भाग भुसभुशीत असणे आवश्यक आहे.

## * पूर्वमशागत

लसणाचे कंद जमिनीत पोसतात आणि त्यांची मुळे १५ ते २० सेंमी खोलीपर्यंत जात असल्याने ३० ते ४० सेंमी खोलीपर्यंत जमीन चांगली भुसभुशीत असणे आवश्यक आहे. शेवटच्या कुळवणीवेळी हेक्टरी २५ ते ३० टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे.

## * सुधारित जाती

लागवडीसाठी फुले नीलिमा, फुले बसवंत, गोदावरी, श्वेता, यमुना सफेद, अग्रिफाऊंड व्हाईट, भीमा ओमकार आणि भीमा पर्पल या जातींची निवड करावी.(महत्वाची सूचना : लागवडीसाठी मागील हंगामात निघालेले थंड व कोरड्या जागेत साठवून पुरेशी विश्रांती मिळालेले बेणे वापरावे.)

## * बियाणांचे प्रमाण

६ ते १० मिमी आकाराच्या कळ्यांसाठी २०० ते २८० किलो/ एकर एवढे लागते. खूप मोठ्या गड्डयांचा आणि जाड पाकळयांच्या वाणांसाठी हे प्रमाण ४०० ते ५०० किलो/एकर लागते.

## * बीज प्रक्रिया

लागवडीपूर्वी लसणाच्या पाकळयांवर कार्बेन्डाझिम २ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे बीज प्रक्रिया करावी. लागवडीपूर्वी लसणाच्या पाकळया द्रावणात दोन तास बुडवून नंतर लागवड करावी किंवा ॲझाटोबॅक्टर @ ६–७ मिली, पीएसबी @ ६–७ मिली, ट्रायकोडर्मा @ १० मिली जिवाणू संवर्धक १ किलो बियाण्यासाठी पाण्यात मिसळून बियाणाच्या पुष्ठभागास समप्रमाणात चोळावे. बियाणे सावलीत सुकवून लगेच पेरणी करावी.

## * लागवड तंत्र

रब्बी हंगामामध्ये ऑक्टोबर ते नोव्हेंबर या काळात लागवड करावी. उशिरा लागवड केल्यास लसणाच्या कंदाचा आकार कमी होतो, वजन कमी भरते. परिणामी उत्पादनात घट होते. निवडलेल्या पाकळ्या सपाट वाफ्यात रुंदीशी समांतर १५ सेंमी अंतरावर खुरप्याने रेषा पाडून त्यात १० सेंमी अंतरावर पाकळया उभ्या लावून कोरड्या मातीने झाकाव्यात.



भिमा ओमकार



भिमा पर्पल



फुले बसवंत



फुले नीलिमा